Exh.01

# अहमदनगर येथील मे. चिफ ज्युडी. मॅजि. साहेब

याचे कोर्टात

8446/2025

एस.सी.सी.नं. /२०२५

**फिर्यादी**

**श्री. व्यंकटेश मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सोसायटी लि. तर्फे अधिकृत प्रतिनिधी श्री. विशाल वामन गोरे,**
वय: २९ वर्ष, धंदा: नोकरी,
मो.नं. ९२२६०९२४७६
पत्ता:३१, ऐक्यनगर कॉलनी, पाईपलाईन रोड, सावेडी,अहमदनगर ४१४००३.

**आरोपी**

**नवनाथ सीताराम मनाल**
वय: ३९ धंदा: व्यवसाय
रा.मु.पो. वाहेगाव ता.गंगापुर जि. औरंगाबाद/ छ. संभाजीनगर ४३११०९
मो.नं.९९७०१५०३१८

**निगोशिएबल इन्स्टुमेंट ॲक्टचे कलम १३८ प्रमाणे फिर्याद -**

**याकामी फिर्यादी आदरपूर्वक कळवितो ते येणेप्रमाणे**

| | | |
|---|---|---|
| १ | चेक देणार | **नवनाथ सीताराम मनाल** |
| २ | चेक नंबर | **,१६७३७४** |
| ३ | चेक तारीख | **१४/०५/२०२५** |
| ४ | चेक रक्कम | **१,४८,०२५/-** |
| ५ | बॅंकेचे नाव व शाखा | **आय डी बी आय बॅंक शाखा गंगापुर** |
| ६ | चेक परत आल्याची दिनांक | **१७/०५/२०२५** |
| ७ | चेक परत आल्याचे कारण | **FUNDS INSUFFICIENT** |
| ८ | नोटीस पाठविल्याची दिनांक | **०९/०६/२०२५** |
| ९ | आरोपीला नोटीस मिळाल्याची तारीख | **१३/०६/२०२५ REFUSED** |

| | | |
|---|---|---|
| १० | गुन्हा घडल्याचा दिनांक | १७/०५/२०२५ |
| ११ | कोणत्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत आहे | **तोफखाना पोलीस स्टेशन, सावेडी, अहमदनगर** |

१. फिर्यादी **श्री. व्यंकटेश मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सोसायटी लि. मुख्य कार्यालय सावेडी, अहमदनगर** ही वित्त पुरवठा करणारी को ऑप क्रेडिट सोसायटी आहे. फिर्यादी ही मल्टीस्टेट को ऑप अॅक्ट २००२ अन्वये स्थापन झालेली असुन फिर्यादी संस्थाचा कारभार सदर कायदयानुसार व सोसायटीच्या पोटनियमानुसार चालतो. फिर्यादी संस्था तिचे सभासदांना तसेच इतर नाममात्र सभासदांना सोनेतारण, वाहन खरेदी, घर बांधकामासाठी, प्लॉट खरेदीसाठी तसेच इतर घरगुती कारणासाठी कर्जपुरवठा केला जातो तसेच ठेवी गोळा करून बॅकिंगचा सर्व प्रकारचा व्यवसाय केला जातो. सदर संस्थेत प्रतिनिधी म्हणुन **श्री. विशाल वामन गोरे** यांना संस्थेने ठराव करून संस्थेच्या वतीने संपूर्ण कोर्ट कामकाज पाहण्याचा अधिकार दिलेला आहे.

आरोपी यांनी फिर्यादी सोसायटीकडे **व्यवसायासाठी** कर्जाऊ रक्कम मिळावी म्हणुन कर्जाची मागणी केली होती व त्यानुसार आरोपी यांनी आवष्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून दिल्यानंतर आरोपी यांच्या कर्जाची मागणी फिर्यादी संस्थेने आरोपीस कर्ज मंजूर करून कर्जप्रकरणातील अटी व शर्तीवर अदा करण्यात आले होते व आहे. आरोपीने फिर्यादी यांच्याकडून दिनांक ०९/०१/२०२३ रोजी रक्कम रूपये **१,००,०००/-** अक्षरी रक्कम रूपये ( **एक लाख रुपये मात्र**) आरोपीने सदरची रक्कम **१२ हप्त्यात** परत फेड करतो अशीखात्री फिर्यादीस दिली.

त्यानंतर मुदत संपल्यानंतर फिर्यादी यांनी वेळोवेळी आरोपीकडे सदर रकमेची मागणी केली असता आरोपीने आपल्याजवळील राहिलेली थकबाकी भरण्यास तयार झाला त्याकामी आरोपीने त्याचे खाते असलेला **आय डी बी आय बँक शाखा गंगापुर चा चेक नं. '१६७३७४**, रक्कम रूपये **१,४८,०२५/-** दिनांक **१४/०५/२०२५** रोजी फिर्यादीस दिला. सदरचे चेक देते वेळी आरोपी म्हणाले कि, "तुम्ही सदरचा चेक तुमचे खातेमध्ये भरा तो निष्चित वटेल व तुम्हांस तुमची रक्कम मिळेल" अशीखात्री व भरवसा फिर्यादीस दिला. सदरचा चेक दिनांक **१६/०५/२०२५** रोजी फिर्यादी संस्थेने वटवण्यासाठी त्यांचे खाते असलेला **ए यु स्माल फायनान्स बँक लि. शाखा - सावेडी अहमदनगर** येथे भरला असता आरोपीचे खात्यात पुरेशी रक्कम शिल्लक नसल्याने सदरचा चेक **FUNDS INSUFFICIENT** असा शेरा मारून

दिनांक १७/०५/२०२५ रोजी न वटता मेमोसह परत आला व फिर्यादीच्या बँकेने तो संस्थेस परत दिला.

अशा प्रकारे आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम शिल्लक नाही याची माहिती व कल्पना असतांना देखील आरोपीने फिर्यादी संस्थेस खोटा चेक दिला व सदर चेक न वटता परत आला म्हणुन फिर्यादी संस्थेने **अॅड.सुरज कुंडलिक खंडीझोड**, अहमदनगर यांच्या मार्फत दिनांक ०९/०६/२०२५ रोजी रजिस्टर पोस्टाने नोटीस पाठवली व **दिनांक** १३/०६/२०२५ रोजी आरोपीने सदरची नोटीस घेण्यास नकार दिला. तरी देखील आरोपीने चेकची रक्कम आणुन दिलेली नाही. अशाप्रकारे आरोपीने निगोशिएबल इन्स्टुमेंट अॅक्टचे कलम १३८ अन्वये फौजदारी स्वरूपाचा गंभीर गुन्हा केलेला आहे म्हणुन फिर्यादीस आरोपी विरूध्द सदरची फिर्याद दाखल करणे भाग पडले आहे.

**सबब फिर्यादीची विनंती की,**

सदर आरोपीस कायदयाप्रमाणे जास्तीत जास्त शिक्षा व दंड करण्यात यावा व सदर दंडातून फिर्यादीस न वटलेल्या चेकची रक्कम देण्याबाबत मे. कोर्टाचा हुकुम व्हावा ही विनंती.

तसेच पुराव्याच्या कामी साक्षीदार म्हणुन,

१) फिर्यादी स्वतः

२) मा. मॅनेजर, **ए यु स्माल फायनान्स बँक लि. शाखा - सावेडी अहमदनगर**

३) मा. मॅनेजर, **आय डी बी आय बँक शाखा गंगापुर**

4) संबंधित पोस्ट मास्तर/कर्मचारी

पुराव्याच्या कामी जादा साक्षीदार व इतर पुरावा लागल्यास तपासण्याची मे. कोर्टाची परवानगी असावी ही विनंती.

येणे प्रमाणे फिर्यादीची फिर्याद असे.

दिनांक: १५/०७/२०२५ — अॅडव्होकेट — फिर्यादी

ठिकाण: अहमदनगर — (एस. के. खंडीझोड)

Reg.No. MSCS/CR/457/2011